

अनान्सी आणि मूर्ख भागीदार

लेखिका: वर्ना आरडेमा; चित्रे: ब्रायन वॉल्डमॅन



अनान्सी आणि मूर्ख भागीदार





पश्चिम आफ्रिकेत अनान्सी नावाचा एक माणूस राहात होता. तो आळशी आणि लोभी होता. काम म्हटले की ते कसे टाळायचे, दुसऱ्याला कसे फसवायचे, याचाच विचार तो सतत करत असे. एकदा सकाळी तो आपली पत्नी, आसोला म्हणाला की तो मासेमारीचा धंदा सुरू करणार आहे.

आसो म्हणाली, “माझ्या एका कानाने ऐकलं. दुसरा कान वाट बघतोय.”

अनान्सी गालातल्या गालात हसला, “ह, ह, ह,” आणि म्हणाला, “मी एखाद्या मूर्खाला धंद्यात भागीदार म्हणून घेणार. तो सगळं काम करणार आणि मासे मात्र मलाच मिळणार.”

“हा!” आसो म्हणाली, “असा मूर्ख तुला कुठे मिळणार?” तिने पाण्याचे मडके डोक्यावर ठेवले आणि ती नदीकडे निघाली.






नदीकाठावर आसोला बोन्सूची पत्नी ललुआ भेटली.
ललुआने विचारले, “कशी आहेस आसो?”
“बरी आहे मी,” आसो उत्तरली. “पण माझा पती काही ठीक नाही. तो मासेमारीचा धंदा करायचं म्हणतोय. तो कुणा मूर्खाला धंद्यात भागीदार म्हणून घेणार आहे. तो मूर्ख सगळं काम करणार आणि मासे मात्र माझ्या पतीला मिळणार.”

घरी गेल्यावर ललुआने आसोची कर्मकहाणी आपला पती बोन्सूच्या कानावर घातली.

बोन्सू काहीएक विचार करून म्हणाला, “मी अनान्सीसोबत मासे पकडायला जातो. त्याच्या धूर्त खेळीत त्यालाच हरवतो.”

बोन्सू अनान्सीच्या घरी गेला. त्याला म्हणाला, “अनान्सी, मी तुझ्यासोबत मासे पकडायला येतो. एकापेक्षा दोन माणसं जास्त मासे पकडू शकतात.”

बोन्सूची कल्पना ऐकून अनान्सीला आश्चर्य वाटले. त्याला थोडी काळजीही वाटली. बोन्सूला फसवणे सोपे नाही. पण तो म्हणाला, “अरे व्वा! ठीक आहे. आधी आपण मासे पकडायचा सापळा बनवूया.”



अनान्सी आणि बोन्सू सापळा बनवण्यासाठी साहित्य शोधू लागले. त्यांना माडाची काही झाडे दिसली. बोन्सू म्हणाला, “अनान्सी, चाकू दे. मी झाडाच्या फांद्या तोडतो. तू माझ्यासाठी थकायचं काम कर.”

“अरे, थांब थांब!” अनान्सी ओरडला, “मी का काम करू तुझ्यासाठी?”


“अरे, थकायचं काम कुणालातरी करावंच लागणार,” बोन्सू उत्तरला, “मी फांद्या तोडण्यात गुंतलेलो असेन तर थकायचं काम तू करायला हवंस.”


त्यावर अनान्सी म्हणाला, “थकायचं काम काही मला जमणार नाही. त्यापेक्षा मी फांद्या तोडतो आणि तू माझ्यासाठी थकायचं काम कर.”

मग अनान्सी माडाच्या झाडावर चढला आणि फांद्या तोडू लागला.

बोन्सू झाडाखाली बसला. अनान्सीने फांदीवर वार केला की बोन्सू थकल्यागत आवाज काढे, “उंह... आह... उंह....आह!”

लवकरच माडाखाली तोडलेल्या फांद्यांचा ढीग साठला.





मग बोन्सू म्हणाला, “अनान्सी, आता तू बसून राहा. मी सापळा बनवतो. माझ्या बोटांना जखमा होतील आणि माझी पाठ दुखेल. तेव्हा माझ्या वेदना सहन करायचं काम तू करायचंस.”

“नाही, थांब जरा!” अनान्सीने नापसंती दर्शवली, “सहन करायचं काम तुलाच चांगलं जमतं, हे मी मघाशी पाहिलंय. त्यामुळे तू ते काम कर. सापळा मीच बनवणार.”

मग अनान्सी सापळा बनवू लागला आणि बोन्सू सहन करू लागला. तो आपल्या कपाळाचा घाम पुसू लागला, पाठ रगडू लागला आणि अध्येमध्ये कण्हू लागला, “अं....उं....अं...उं...”

बोन्सू एवढ्या मोठ्याने कण्हत होता की अनान्सीचे आपल्या कष्टाकडे लक्षच गेले नाही. माडाच्या झावळ्या बांधून आणि विणून एकदाचा त्याने सापळा तयार केला.

“अनान्सी, किती छान सापळा बनवलास तू!” सापळा आपल्या डोक्यावर ठेवत बोन्सू म्हणाला, “नदीवर जाताना कुणी पाहिलं तर त्यांना वाटेल की मीच बनवलाय हा सापळा.”

“थांब जरा!” अनान्सी ओरडला, “सापळा बनवायचं श्रेय तुला का मिळावं!” म्हणून अनान्सीने बोन्सूच्या डोक्यावरचा सापळा स्वतःच्या डोक्यावर ठेवला.


दोघे नदीकाठी आले तेव्हा बोन्सू म्हणाला, "अनान्सी, नदीत मगरी आहेत. मी सापळा लावतो. मगरीने माझा पाय पकडून पाण्यात नेलं तर मरायचं काम तू कर."

"अरे, थांब थांब!," अनान्सी ओरडला, "मला मूर्ख समजलास काय! मी स्वत:च सापळा लावतो. मगरीने मला पकडलं तर मरायचं काम तू करायचंस."

अनान्सी सापळा घेऊन नदीत उतरला. त्या भागात लांब देठांची रोपटी होती. सापळा एका रोपट्याच्या देठाला बांधण्यासाठी तो हाताने पाण्यात चाचपडू लागला. चुकून त्याचा हात एका खेकड्यावर पडला.

आणि बापरे! खेकड्याच्या मोठ्या नांगीने अनान्सीच्या करंगळीला घट्ट पकडून ठेवले.

"अयाईssss!" अनान्सी किंचाळू लागला आणि पाण्यातून उड्या मारत काठावर आला. गळाला मासा लटकत असतो तसा खेकडा त्याच्या हाताला लटकत होता.





बोन्सूने खेकड्याच्या नांगीतून अनान्सीचे बोट सोडवले. मग तो अनान्सीला म्हणाला,

"आजपर्यंत मी एवढा मोठा खेकडा पाहिलेला नाही. तुला आणि आसोला आज चविष्ट जेवण मिळेल."

"नाही! हा खेकडा तुझ्या वाट्याचा आणि उद्या सकाळी सापळ्यात अडकलेलं सारं काही माझ्या वाट्याचं! मंजूर आहे?" जखमी करंगळीवर झाडाचं पान लपेटता लपेटता अनान्सी म्हणाला.

बोन्सूच्या हातातील मोठा खेकडा पाहून ललुआने आनंदाने टाळी वाजवली. लगेच तिने खेकडा शिजवण्यासाठी चुलीवर भांडे ठेवले.





अनान्सी घरी परतल्यावर आसोने विचारले, “कसा झाला आजचा कार्यक्रम?”

“कोणता कार्यक्रम?” अनान्सीला मासोमारीचा विषय टाळायचा होता.

“अहो, मासेमारीचा कार्यक्रम!” आसो म्हणाली

“ते होय! आम्ही सापळा लावलाय नदीत. उद्या सकाळी त्यात जे काही अडकलेलं असेल ते सगळं आपलंच,” अनान्सी म्हणाला.

पुढच्या सकाळी काळोख सरल्यावर अनान्सी आणि बोन्सू नदीकाठी सापळा बघायला गेले. तिथे पोहोचल्यावर त्यांना सापळ्याभोवतीची रोपटी सळसळत असताना दिसली.

दोघे पळतच नदीत उतरले. सापळ्याचे मोठे तोंड त्यांनी त्वरेने बंद केले आणि सापळा खेचत काठावर आणला. सापळा खूप जड वाटत होता. त्यात कुणी काळा काळा प्राणी वेटोळे घालून बसला होता. सापळा काठावर ठेवून अनान्सी व बोन्सू दूर जाऊन उभे राहिले.


त्याचवेळी सापळ्याच्या तोंडावरचे झाकण फाट्कन उघडले. सापळ्यातून एक भला मोठा अजगर बाहेर आला. त्याच्या शरीरावर बरेच उंचवटे होते.


“बघ त्याला, त्या अजगराने सापळ्यात सापडलेल्या तुझ्या सगळ्या माशांना खाऊन टाकलं. मोज त्यांना!”

अनान्सी मोजू लागला, “एक, दोन, तीन,चार......”

तोवर अजगराने आपलं भलंमोठं शरीर सरपटत नेऊन पुन्हा नदीत डुबकी मारली, *डुब्बुक*!

अनान्सी म्हणाला, “बोन्सू, आता सापळ्यात अडकलेलं घेऊन जायची पाळी पुन्हा माझीच! आपण इथेच थांबू आणि पाहू.”






दोघांनी सापळा पुन्हा नदीत लावला. खूप वेळ गेला. शेवटी त्यांना माशांची चाहूल लागली.

अचानक नदीत शेकडो मासे पाण्यातून झेप घेत पाण्याबाहेर येऊ लागले आणि पुन्हा पाण्यात डुबकी मारू लागले. सर्व मासे प्रवाहाच्या दिशेत पोहत होते.

अनान्सी उडी मारून उभा राहिला आणि किंचाळला, “सापळ्यात या, सापळ्यात या!“

“एक मगर त्या माशांचा पाठलाग करतेय,” बोन्सू म्हणाला.



अचानक सापळा पाण्याबाहेर आला. त्यातील सगळे मासे जमिनीवर विखुरले. सापळ्यात मगरीचा जबडा अडकला होता.

मगरीने सापळ्यातून सुटका करून घेण्यासाठी डोके जोरजोरात हलवले. मग ती सरपटत पाण्याबाहेर आली.

अनान्सी पटकन एका झाडावर चढला आणि बोन्सू दुसऱ्या झाडावर. मगर त्यांचा सापळा जमिनीवर आपटू लागली. शेवटी एकदाचा सापळा मगरीच्या डोक्यावरून सटकून दूर जाऊन पडला. मगर सावकाश पाण्यात परतली आणि पुन्हा माशांचा पाठलाग करू लागली.

अनान्सी आणि बोन्सू झाडावरून उतरले आणि सापळ्याचे निरीक्षण करू लागले.


बोन्सू म्हणाला, “अरेरे! हा सापळा आपल्या काही कामाचा राहीला नाही. पण त्याची अवस्था इतकीही काही वाईट झालेली नाही. मी बाजारात जाऊन याला विकून येतो.”


“अरे, थांब थांब!” अनान्सी तात्काळ उत्तरला, “या सापळ्याने मला एकही मासा दिला नाही. खेकडासुद्धा नाही. आणि आता हा सापळा तू विकलास तर माझं नुकसानच होईल. त्यापेक्षा मी स्वतःच बाजारात जाऊन हा विकून येतो.”

अनान्सी सापळा घेऊन बाजारात गेला. त्याने सापळा जमिनीवर ठेवला आणि त्याच्या शेजारी बसून ओरडू लागला, “माशाचा सापळा विकत घ्या. माशाचा सापळा विकत घ्या.”

बाजारात येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांनी सापळ्याची दुरावस्था पाहिली. त्यांनी गावच्या प्रमुखाकडे अनान्सीची तक्रार केली.

गावचा प्रमुख अनान्सीकडे आला आणि म्हणाला, “तुला काय वाटलं, हा तुटका-फुटका सापळा विकत घ्यायला माझ्या गावातली लोकं काय मूर्ख आहेत? तू आमचा अपमान करतोयस, लक्षात ठेव.”






मग गावच्या प्रमुखाच्या आदेशावरून अनान्सीने सापळा आपल्या डोक्यावर ठेवला आणि तो बाजारात हिंडत ओरडू लागला, “हा तुटका-फुटका सापळा विकत घ्या. हा तुटका-फुटका सापळा विकत घ्या.”

अनान्सीला खूप लाज वाटू लागली. बाजारातील लोक त्याच्यावर हसू लागले. मुले त्याच्या पाठीपाठी गोंगाट करत पळू लागली.

हे सारं नाट्य संपल्यावर बोन्सू अनान्सीकडे आला आणि म्हणाला, “अनान्सी, तू मासे पकडण्यासाठी एक मूर्ख शोधत होतास ना! असा मूर्ख शोधायला तुला दूर जायची गरज नाही. तू स्वतःच एक मूर्ख आहेस.”


अनान्सी म्हणाला, “बोन्सू, कसा भागीदार आहेस तू! लोक माझी चेष्टा करत होते तेव्हा तू किमान मला वाटलेली लाजतरी वाटून घ्यायचं काम करायचंस.”



पुढच्या दिवशी सकाळी आसो आणि ललुआ यांची नदीकाठावर भेट झाली. तिथे नदीकाठावरच्या रोपट्यांनी माना टाकलेल्या त्यांनी पाहिल्या. नदीकाठची मातीही अस्ताव्यस्त झाली होती. आपल्या पतींच्या मासेमारीच्या धंद्याचे हे परिणाम आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. .

बोन्सूने अनान्सीला फसवून सारे काम कसे करून घेतले त्याची कहाणी ललुआने आसोला सांगितली. आसो जोरजोरात हसू लागली. तिच्या डोक्यावरचे मडके घसरून खाली पडले.

आसोने त्वरीत मडके हातात झेलले आणि म्हणाली, “कुणीतरी म्हटलंच आहे, जो दुसऱ्यासाठी खड्डा खणतो, तो स्वत:च त्यात पडतो.”



समाप्त